# ग्राम पंचायत विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

**योजनेचे नाव - जिल्हा ग्राम विकास निधी.**

**योजना कोणाची** - ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर

**योजनेची संक्षिप्त माहिती** -

सदर योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील सर्व 1026 ग्रामपंचायतीकडून त्यांनी मागील वर्षामधील स्वउत्पन्नाच्या 0.25 टक्के इतका निधी जिल्हा परिषद कोल्हापूर ग्रामपंचायत विभागाकडील जिल्हा ग्राम विकास निधी खाते क्रमांक 023411002001166 केडीसीसी बँक जिल्हा परिषद शाखेमध्ये प्रत्येक वर्षी जमा करणेत येत आहे. सदर जमा झालेल्या निधीतून ग्रामपंचायतीना विविध विकास कामासाठी मागणी नुसार कर्ज स्वरूपात रक्कम वितरीत करणेत येते.सदर कर्ज रक्कमेवर वार्षिक 5% व्याज असते. कर्जाचे हप्ते एकूण 10 असुन कर्ज वेळेत जमा न झालेस दंडव्याज हे 2 % असते.

**योजनेचे निकष व अटी शर्ती**

ग्रामपंचायतीची कर्ज परतफेड करणेची पत तपासून त्याप्रमाणे विस्तार अधिकारी (पं) छाननी होवून गट विकास अधिकारी यांचे शिफारशीनुसार संपुर्ण कागदपत्रांची छाननी होवून कर्ज दिले जाते. आवश्यक कागदपत्रांची चेकलिस्ट पंचायत समिती स्तरावर उपलब्ध केलेली आहे.

**योजनेचे फायदे**

सदर योजने अंतर्गत ग्रामपंचायतींना वित्तीय कर्ज सुलभतेने उपलब्ध होवून त्या अंतर्गत विविध विकास कामे पुर्ण होवून ग्रामपंचायतीस सदर विकास कामातून उत्पन्नवाढ झालेली आहे. उदा. दुकानगाळे बांधकाम, वॉटर मिटर्स बसवणे, सभागृह बांधने इ. कामे